दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● मंगळवार दि.९ सप्टेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक २४ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Tuesday 8 Sep 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 24 ● Pages 4 ● Rate 4 Rs

प्रतिनिधी नेमणे आहे
लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

# अजित पवारांच्या वरदहस्ताने २०० कोटींचा भ्रष्टाचार-आ.रोहित पवार यांचा थेट आरोप

**पुणे (वृत्तसंस्था)-पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये २०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. इतकेच नाही तर हा भ्रष्टाचार उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वरदहस्ताने झाला असल्याचा दावा देखील त्यांनी केला आहे. या प्रकरणामुळे अजित पवार यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.या संदर्भात आमदार रोहित पवार यांनी एका पोस्टच्या माध्यमातूनही अजित पवार यांच्यावर निशाणा साधला आहे. या गैरव्यवहारावर पांघरून घातलं जावं म्हणून अधिकारी आणि मंत्र्यांपर्यंत हप्ते जातात अशी चर्चा, असल्याचा दावा देखील त्यांनी केला आहे. यावर कारवाई करण्यासाठी त्यांनी सरकारला १५ दिवसांची मुदत देखील दिली आहे. अन्यथा शेतकऱ्यांसोबत मोठं आंदोलन केलं जाईल, असा इशारा देखील रोहित पवार यांनी दिला आहे.**

## १५ दिवसांत कारवाई करण्याची मागणी



शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी स्थापन झालेली पुणे कृषी उत्पन्न बाजार समिती ही गुंड आणि भ्रष्टाचारी यांच्या विळख्यात अडकली असून अधिकारी आणि सदस्य यांच्या संगनमताने इथं सुमारे २०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालाय. विशेष म्हणजे या भ्रष्टाचाऱ्यांना मा. अजितदादा यांचा वरदहस्त असल्याचं तेच सांगत असल्याने अजितदादांनीही याबाबत खुलासा करण्याची गरज आहे. याबाबत सविस्तर पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली. यावेळी प्रवक्ते विकास लवांडे हे उपस्थित होते.श्री. विकास लवांडे हे गेल्या अनेक दिवसांपासून या भ्रष्टाचारावर आवाज उठवत आहेत. बेकायदा भाडे वसुली (जी ५६ गैरव्यवहार), ४ हजार लोकांना अनधिकृत परवाना, अनधिकृतपणे बाजार समितीच्या जागा भाड्याने देणे, रोजंदारी सेवकांच्या कायम नियुक्तीत भ्रष्टाचार, गाळ्यांचे अनधिकृत वाटप, शेतकऱ्यांसाठी असलेली स्वच्छतागृहे बंद करुन त्या जागा अनधिकृतपणे सलून किंवा गुटखा विक्रीसाठी देणं, संचालकांकडूनच पार्किंगच्या नावाखाली केली जाणारी लूट, सुरक्षारक्षकांच्या नियुक्तीत भ्रष्टाचार, गुंडांचा सर्रास वापर, यातून व्यापाऱ्यांना होणारा त्रास, स्वच्छता कंत्राटात गैरव्यवहार असे अनेक प्रकारचे गैरव्यवहार या बाजार समितीत सर्रासपणे सुरु आहेत. या प्रकरणाच्या चौकशीसाठी डीडीआर जगताप यांची नेमणूक केली असली तरी तेच गैरव्यवहारात अडकले आहेत. गैरव्यवहाराच्या या प्रकरणाची चौकशी करण्याचा मुद्दा विधानसभेत उपस्थित केला असतानाही पणन संचालकांकडून पारदर्शकपणे चौकशी होत नाही.कळस म्हणजे गैरव्यवहारावर पांघरून घातलं जावं म्हणून अधिकारी आणि मंत्र्यांपर्यंत हप्ते जातात अशी चर्चा आहे. त्यामुळं पुढच्या १५ दिवसांत सरकारकडून याविरोधात कारवाई झाली पाहिजे, अन्यथा शेतकऱ्यांसोबत मोठं आंदोलन केलं जाईल, याची सरकारने नोंद घ्यावी.

# सुजात आंबेडकर यांची परळीत २९ सप्टेंबर रोजी एल्गार सभा

**परळी । प्रतिनिधी**

परळी शहरात २९ सप्टेंबर रोजी सुजाता आंबेडकर यांची एल्गार जाहीर सभा आयोजित करण्यात आली. जिल्हा याबाबत सविस्तर माहिती अशी की दि.५ सप्टेंबर २०२५ रोजी परळी शहर संपर्क कार्यालयात वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा अध्यक्ष शैलेश कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली व वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली व वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा उपाध्यक्ष प्रसंनजीत रोडे सहसचिव अँड. संजय रोडे , जिल्हा प्रसिद्धीप्रमुख बालासाहेब जगतकर यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक घेण्यात येऊन या बैठकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पणतू व वचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय अँड. बाळासाहेब आंबेडकर यांचे चिरंजीव युवकांचे हृदय सम्राट सुजाता आंबेडकर यांचा आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती व नगरपालिका यांच्या होऊ घातलेल्या निवडणुक पूर्वीचा झंजावात सुरू झाला असून याचाच एक भाग म्हणून परळी शहरात वंचितची एल्गार सभाच नव्हे तर वंचितांच्या हक्काचा आणि स्वाभिमानाचा रणघोष असून सुजात आंबेडकर यांची सभा ठरवेल उद्याचा बदल त्यामुळे ही सभा आयोजित करण्यात आली असून या सभेच्या पूर्वनियोजित तयारीसाठी काल परळी शहर तालुक्यातील अनेक पदाधिकारी हीतचिंतक व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी प्रामुख्याने भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष एच.टी. वाघमारे. समता सैनिक दलाचे प्रमुख डॉ.स्वप्निल महाळंगीकर, यशपाल बचाटे, डॉ. सिद्धार्थ जगतकर यांच्यासह वंचित बहुजन आघाडी वंचित बहुजन युवा आघाडी यासह विविध शाखांचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते यावेळी एल्गार सभेच्या तयारीसाठी याच बैठकीत ७० हजार रुपये जमा झाले असून पुढील होणाऱ्या सभेसाठी सर्व कार्यकर्ते हितचिंतक व पदाधिकारी यांनी तन मन धन लावून काम करावे असेही आव्हान वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष गौतम साळवे वंचित बहुजन युवा आघाडीचे तालुका अध्यक्ष राजेश सरवदे वंचित बहुजन युवा आघाडीचे महासचिव ज्ञानेश्वर गीते, उपाध्यक्ष अवि




मुंडे वंचित बहुजन आघाडीचे शहर उपाध्यक्ष संदीप ताटे नंदकुमार सावंत, जयपाल जगतकर, वंचित बहुजन युवा आघाडीचे परळी शहराध्यक्ष प्रेम जगतकर, सिद्धूधन आचार्य, आदर्श जंगले यांच्यासह जिल्हा पदाधिकारी तालुका पदाधिकारी शहर पदाधिकारी इत्यादीने केले असून या बैठकीस अनिल अवचार, अजय वावळे, संदीप गायकवाड, वैभव मस्के, प्रेम मस्के, राष्ट्रपाल केदारे, राहुल बचाटे, विकास पवार, विकास चोपडे, विजय झिंजुर्डे, धम्मपाल किरवले, विजय झिंजुर्डे, केशव कांबळे, अभिनव मस्के, संदेश आदोडे, संतोष वावळे, समाधान कांबळे, ब्रह्मानंद साळवे, प्रभाकर गावडे, प्रमोद रोडे, उत्तम रोडे, नवनाथ रोडे, बालासाहेब बनसोडे, सुभाष रोडे, बाळासाहेब किरवले, यांच्यासह अनेक कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# तळोदा उपजिल्हा रुग्णालयात चार रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया गरजू रुग्णांना मिळाला दिलासा

**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा उपजिल्हा रुग्णालयात कलावती फाउंडेशन रुग्ण सहायता केंद्राच्या पुढाकाराने चार रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया पार पडल्या. यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे. रतिलाल राजाराम चौधरी यांच्या पाठीवरील गाठीची शस्त्रक्रिया, हर्षल शैलेंद्र सूर्यवंशी यांची हायड्रोसिलची शस्त्रक्रिया, होमामोंजी वळवी यांच्या कपाळावरील गाठीची शस्त्रक्रिया, फतेसिंग लक्ष्मण पाडवी यांची हायड्रोसिलची शस्त्रक्रिया. या शस्त्रक्रियांसाठी डॉ. रोहित वसावे आणि डॉ. राहुल वसावे यांचे वैद्यकीय मार्गदर्शन लाभले, तर भूलतज्ज्ञ मीना चव्हाण आणि शस्त्रक्रिया सहाय्यक सागर पावरा यांनी मोलाचे योगदान दिले. शस्त्रक्रियेनंतर आमदार राजेश पाडवी यांनी रुग्णालयात जाऊन चारही रुग्णांची भेट घेतली. त्यांनी रुग्णांची विचारपूस केली आणि त्यांना धीर



दिला. यावेळी कलावती फाउंडेशन रुग्ण सहायता केंद्राचे समन्वयक योगेश मराठे, मुकेश बिराडे, राकेश महाले, अण्णा पाटील आणि रोहन गुरव उपस्थित होते. या घटनेतून हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे की, कलावती फाउंडेशन रुग्ण सहायता केंद्र ग्रामीण भागातील गरजू रुग्णांसाठी आशेचा किरण ठरत आहे.

# माझ्या मुलीचे अंत्यसंस्कार कुठे करू?

## विस्थापित पालकाचा सवाल?

## मोड वसाहतीतील हृदयद्रावक घटना

**नंदुरबार । दिपक गोसावी**

सरदार सरोवर प्रकल्पग्रस्तांसाठी स्थापन झालेल्या मोड ता. तळोदा पुनर्वसन वसाहतीतील रहिवासी अमर भाईजी वसावे यांचा आक्रोश ऐकून अनेकांचे डोळे पाणावले. पाच दिवसांच्या चिमुकलीच्या मृत्यूनंतर त्यांच्यासमोर अंत्यसंस्काराचा गंभीर प्रश्न उभा राहिला, कारण या वसाहतीत स्मशानभूमीच नाही. अखेर अखंड कोसळणाऱ्या पावसात मृत बालिकेचे प्रेत घेऊन त्यांना मूळ गाव गाठावे लागले. या घटनेने पुनर्वसनाच्या नावाखाली विस्थापित झालेल्या लोकांच्या वेदना पुन्हा एकदा समोर आल्या आहेत.

गेली अनेक वर्षे ही वसाहत अस्तित्वात असूनही, येथे मूलभूत सुविधांचा अभाव आहे. शाळा, दवाखाना, ग्रामपंचायत, समाजमंदिर, बीजभांडार आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्मशानभूमीही अद्याप उपलब्ध करून दिलेली नाही. जिल्ह्याचे अनेक जिल्हाधिकारी बदलले, प्रत्येकाने या वसाहतीला भेट दिली, प्रकल्पग्रस्तांचे गाऱ्हाणे ऐकले, पण परिस्थिती 'जैसे थे'च आहे.

अमर वसावे यांच्यावर आलेली ही वेळ नवीन नाही. चार वर्षांपूर्वीही याच वसाहतीतील दमन्या जुगला वसावे यांचे निधन झाल्यानंतर त्यांचे अंत्यसंस्कार मूळ गावीच करावे लागले होते. या घटना प्रशासनाच्या निष्काळजीपणावर आणि असंवेदनशीलतेवर बोट ठेवतात.पुनर्वसनाच्या नावाखाली आम्हाला गाव सोडायला लावलं, पण जगण्यासाठी शाळा-रुग्णालय नाही, आणि मरणानंतर स्मशानभूमीही नाही हे कसले पुनर्वसन? असा संतप्त सवाल अमर वसावे यांनी उपस्थित केला आहे. हा प्रश्न केवळ एका कुटुंबाचा नसून, संपूर्ण मोड वसाहतीतील प्रत्येक कुटुंबाचा आहे. विस्थापितांचे जीवन असो वा मृत्यूनंतरचा शेवटचा प्रवास, दोन्ही ठिकाणी त्यांना अपमानच सहन करावा लागत आहे. प्रशासनाने निव्वळ आश्वासने देण्याऐवजी, तातडीने या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी जोर धरत आहे.

# आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांचे 'ओएसडी'पदी प्रा.डॉ.हमराज उईकेंची नियुक्ती

## डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते सत्कार; नवगण शिक्षण संस्थेमध्ये आहेत कार्यरत

**बीड । प्रतिनिधी**

राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांनी प्रा.डॉ.हमराज उदयभान उईके यांची 'ओएसडी'पदी (विशेष कार्य अधिकारी) राज्य शासनाने नियुक्ती केली आहे. ते नवगण शिक्षण संस्था संचलित परळी येथील कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या मराठी विभागाचे प्रमुख असून त्यांच्या नियुक्तीबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष तथा संस्थेचे सचिव डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला आहे.प्रा.डॉ.हमराज उईके यांनी नियुक्तीनंतर मंत्री कार्यालयात रुजू होऊन कार्यभार स्वीकारला. त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात भरीव योगदान दिलेले आहे. 'भारतीय इतिहासाच्या जडणघडणीत जनजाती (आदिवासी) समाजाचे योगदान व भूमिका' या विषयावर नुकतेच बीडमध्ये आंतरराष्ट्रीय चर्चासत्र पार पडले. या चर्चासत्राचे निमंत्रक म्हणून त्यांनी मोलाची भूमिका बजावली. त्यांची शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यतत्परता लक्षात घेता आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांनी प्रा.डॉ.हमराज उईके यांच्यावर 'ओएसडी' पदाची जबाबदारी दिली असून, त्यांच्या नियुक्तीमुळे विभागाचे कार्य अधिक वेगवान व परिणामकारक होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. तसेच, नियुक्तीबद्दल प्रा.डॉ.हमराज उईके यांचे सर्वस्तरातून अभिनंदन केले जात आहे.



# रेल्वे स्टेशनपर्यंत शहर बस वाहतूक सुरू करा

**बीड । प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आज रोजी जिल्हाधिकारी यांना बीड बस स्थानक ते रेल्वे स्थानकापर्यंत शहर बस सेवा सुरू करण्यासाठी निवेदन देण्यात आले चाळीस वर्षाच्या प्रतीक्षेनंतर येत्या १७ सप्टेंबर २०२५ पासून बीड ते अहिल्यानगर रेल्वे सेवा रेग्युलर सुरू होणार आहे बीड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणापासून रेल्वे स्थानकाचे अंतर चार ते पाच किलोमीटर एवढे आहे बाहेर गावावरून येणाऱ्या




प्रवाशांना तिथपर्यंत जाण्यासाठी लागणारा प्रवास खर्च हा न परवडणार आहे तसेच रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची फार मोठी गैरसोय त्यामुळे होणार आहे रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची तसेच शहरातील नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून वंचित बहुजन आघाडी बीड जिल्ह्याच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन १७ सप्टेंबर पूर्वी बीड बस स्थानक ते रेल्वे स्थानकापर्यंत तातडीने शहर बस वाहतूक सुरू करावी याकरिता निवेदन देण्यात आले यावेळी उपस्थित जिल्हा महासचिव खंडू जाधव, जिल्हा उपाध्यक्ष पुरुषोत्तम वीर, ज्ञानेश्वर कवठेकर, अर्जुन जवंजाळ, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख राजेश कुमार जोगदंड, सम्यक विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष रोहन मगर, युवा नेते प्रकाश उजगरे बीड शहराध्यक्ष लखन जोगदंड, मिलिंद सरपते, अमर ससाने, प्रदीप खळगे इत्यादी उपस्थित होते.

संपादकीय

# 'जीएसटी'चा नवा अवतार




अमेरिकेने पुकारलेल्या व्यापारयुद्धामुळे निर्यातीला फटका बसण्याची भीती, युद्धांमुळे जगभरात विस्कळित झालेली पुरवठा साखळी आणि देशांतर्गत मागणीअभावी मंदावलेला विकास, अशा चिंता फेर धरत असतानाच वस्तू आणि सेवाकरामध्ये (जीएसटी) करण्यात आलेल्या सुधारणा क्रांतिकारी म्हणाव्यात, अशाच आहेत. हा कर लागू झाल्यापासून त्यातील चार स्तरांची किचकट रचना, वाढते दर आणि विविध पूर्ततांचे जंजाळ यांमुळे लाखो व्यावसायिक हैराण झाले होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात या बदलांचे सूतोवाच केले होते. त्यानंतर अर्थ मंत्रालयाने सादर केलेल्या नव्या प्रस्तावास जीएसटी परिषदेनेही मान्यता दिल्यानंतर ५, १२, १८ आणि २८ टक्के, या पूर्वीच्या चार स्तरांऐवजी ५ आणि १८ टक्के अशी दोन स्तरांची सुटसुटीत रचना लागू होईल. त्याशिवाय दुग्धजन्य पदार्थांपासून, कपडे, पादत्राणे आणि लहान मोटारी, दूरचित्रवाणी संचांपर्यंत अनेक वस्तूंवरील कर कमी करण्यात आल्याने बाजारपेठांमध्ये धामधूम होऊन दिवाळी गोड होण्याच्या आशा आहेत. विशेषत: वाढत्या उपचारखर्चाने हतबल झालेल्या लाखो कुटुंबांना विमा आणि आरोग्यविम्यावरील कर हटविण्यामुळे मोठाच दिलासा मिळाला आहे.

देशातील अप्रत्यक्ष करणप्रणालीचा चेहरामोहरा बदलणारी 'जीएसटी'ची रचना स्वीकारून आठ वर्षे पूर्ण झाली आहेत. ३० जून २०१७ रोजी मध्यरात्री यासाठी भरलेल्या संसदेच्या अधिवेशनाची तुलना स्वातंत्र्यलढ्याशी करण्यात आली होती. मात्र, त्यातील गुंतागुंतीची रचना, कच्च्या मालावर अधिक आणि तयार उत्पादनांवर कमी करआकारणीसारख्या (इन्व्हर्टेड ड्युटी स्ट्रक्चर) अनेक विसंगती, वेगवेगळ्या पूर्ततेच्या अटींचे जंजाळ आणि चौपदरी आकारणी यांमुळे व्यावसायिक हैराण झाले होते. विरोधी पक्षांनी तर यावर 'गब्बरसिंग टॅक्स' अशी टीकास्त्रे सोडली होती. करांचे दोनच दर असावेत, ही मागणी विरोधकांसह अर्थतज्ज्ञांकडूनही करण्यात येत होती. त्याशिवाय कराचे पैसे जमा असतानाही परताव्याची कटकटींची प्रक्रिया आणि नोकरशाहीचा जाच यांमुळे व्यावसायिक वर्गात तीव्र संताप होता. या सगळ्याची दखल घेऊन सरकारने 'जीएसटी २.०' ची घोषणा केली आहे.

अमेरिकेने लादलेले आयातशुल्क आणि जागतिक व्यापारयुद्धे यांच्याशी या निर्णयाचा संबंध जोडला जाणे साहजिक आहे; परंतु अर्थ मंत्रालयाकडून गेले सहा महिने या संदर्भात पूर्वतयारी सुरू होती, हेही लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळेच जागतिक पातळीवर अत्यंत अस्थिर परिस्थिती असतानाही करसुधारणांचे ठाम पाऊल उचलण्यामागील प्रबळ राजकीय इच्छाशक्ती स्वागतार्ह आहेच; त्याशिवाय वेगवेगळ्या राज्यांमध्ये या बदलांवर सहमती घडविण्यासाठी अर्थ मंत्रालयाने केलेल्या प्रयत्नांनाही याचे श्रेय दिले पाहिजे.गेल्या काही काळापासून जगभरात मंदीचे सावट दिसते आहे. करोनाकाळात ठप्प झालेले व्यवहार पूर्णतः मूळ पदावर आलेले नाहीत. उलटपक्षी युद्धजन्य परिस्थितीमुळे पुरवठा साखळीही विस्कळित झाली आहे. त्यातच अमेरिकेच्या प्रचंड आयातशुल्कामुळे भारताच्या निर्यातीवर परिणाम होऊन अनेक क्षेत्रांना याचा फटका बसण्याची भीती आहे. ही स्थिती सुधारण्यासाठी देशांतर्गत मागणी वाढावी, अशी अपेक्षा अर्थतज्ज्ञ करीत होते. त्या पार्श्वभूमीवर वाजवी करआकारणी आणि सुलभ-सुटसुटीत करप्रणाली या कसोट्या पूर्ण करणाऱ्या बदलांमुळे देशांतर्गत मागणीत वाढ होऊन अर्थचक्राला गती मिळेल आणि रोजगारनिर्मितीची वाढेल, अशी आशा आहे.अनेक वस्तूंवरील कर कमी झाले असले, तरी हा स्वस्ताईचा सांगावा आहे का, हे स्पष्ट होण्यास काही कालावधी जावा लागेल; कारण कर कमी झाले, तरी त्याचे लाभ ग्राहकांपर्यंत पोहोचण्यामध्ये व्यावसायिकांची भूमिका महत्त्वाची असेल. त्यांनी नफेखोरीला आवर घातला नाही, तर सरकारचे प्रयत्न व्यर्थ ठरतील. या निर्णयामुळे सरकारला महसुली तुटीचा सामना करावा लागेल, अशी भीती व्यक्त होत आहे. मात्र, दर कमी करून प्रक्रिया सुलभ केल्यास कराचा पाया व्यापक होऊ शकतो; तसेच व्यवहारांमध्ये वाढ झाल्याने कररूपी उत्पन्नाचा मेळ घालता येतो, असाही अनेक देशांतील अनुभव आहे.राजकीय नफ्यातोट्याची गणिते मांडल्याखेरीज कोणतेही महत्त्वाचे निर्णय घेतले जात नाहीत, हे मोदी सरकारचे सूत्र आहे. त्या दृष्टीने बिहार निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर घेतलेल्या या निर्णयाकडे पाहता येते. या बहुप्रतीक्षित करसुधारणांमुळे करदात्यांच्या कटकटी कमी होण्याच्या आणि अर्थव्यवस्थेला गती मिळण्याच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

# स्वस्ताई येणार?




सणांत आनंद असतोच. पण, सणाआधीच सणाचा आनंद देण्याची किमया केंद्र सरकारच्या जीएसटी संदर्भातील सुधारणांनी केली आहे. बाजारात त्यामुळे सध्या 'फील गुड' वातावरण आहे. 'फील गुड' म्हणण्याचं कारण एवढंच, की या सुधारणा २२ सप्टेंबरपासून अमलात येणार आहेत. सुधारणा प्रत्यक्षात अमलात यायला आणखी १५ दिवसांचा अवधी असला, तरी त्याची सविस्तर घोषणा आधीच झाली असल्यामुळे उत्पादक, विक्रेते आणि ग्राहकांनाही या सुधारणा गृहीत धरून तयारी करायला पुरेसा वेळ मिळणार आहे. भारतीय संस्कृतीत सण वर्षभर असले, तरी 'दिवाळी हा सर्व सणांचा राजा' असं म्हटलं जातं. दिवाळीनिमित्ताने बाजारात होणारी उलाढाल, खेळणारा पैसा हा वर्षातल्या अन्य कुठल्याही काळापेक्षा कितीतरी अधिक असतो. ग्राहकांची मागणी लक्षात घेऊन त्यासाठी नवरात्रीपासूनच बाजार फुललेला असतो. मालाचा भरपूर पुरवठा असतो. जीएसटीतील सुधारणांमुळे जीवनावश्यक घरगुती उपयोगाच्या किंवा वाहनांसारख्या सणासुदीला खरेदी होणाऱ्या वस्तूंच्या किमती कमी होणार असल्याने त्याची मागणी यावेळी कितीतरी वाढेल, असा अंदाज आहे. ही मागणी पूर्ण करण्यासाठी पुरवठा; म्हणजे उत्पादन वाढेल आणि त्या उत्पादनासाठी रोजगाराची मागणी वाढणं अपरिहार्य आहे. त्यामुळे, केवळ किमतीतील घटच नाही, रोजगाराच्या मागणीत वाढ झाल्यामुळेही अर्थचक्राला चांगली गती येईल. त्यामुळे, यावर्षी आनंदी आनंद कांकणभर जास्तच असेल, असा अर्थतज्ज्ञांचा अंदाज आहे.करप्रणालीमध्ये एकसूत्रता आणण्यासाठी देशाला जीएसटी सारखी करप्रणाली आवश्यकच होती. त्यामुळे जुलै २०१७ मध्ये जेव्हा ती लागू झाली, तेव्हा तिचं बहुशः स्वागतच झालं. त्यातल्या तपशिलाबाबत मात्र अनेक तक्रारी होत्या. करपात्र बाबींचं वर्गीकरण करताना केलेल्या पाच श्रेणी हे टीकेमागचं पहिलं कारण होतं. दुसरी तक्रार होती, ती वस्तूंच्या वर्गीकरणाबाबत. चपाती आणि पराठा यांना वेगवेगळ्या श्रेणीतून वेगवेगळे कर लावण्यात आले होते. तयार मालावरचा कर अनेक बाबतीत त्याला लागणाऱ्या कच्च्या मालापेक्षा कमी होता! महिलांनी मासिक पाळीच्या काळात वापरायच्या पॅडचा प्रसार होणं, त्याचा वापर तळातल्या आर्थिक स्तरातही होणं महिलांच्या आरोग्याच्यादृष्टीने आवश्यक असल्याने त्यावर कमीत कमी कर असणं योग्यच होतं. पण, या पॅडसाठी लागणाऱ्या कच्च्या मालावर पॅडपेक्षा जास्त कर लावल्याने हेतू कसा साध्य होणार होता? हा प्रश्न होता. कपड्यांच्या बाबतीतही तसंच. सुती धाग्यावर १८ टक्के, कृत्रिम धाग्यावर १२ टक्के, तर तयार कपड्यांवर ५ टक्के कर होता. असं अनेक बाबतीत होतं. खाण्याचे पदार्थ, आयुर्वेदिक औषधं सुटी विकली, तर कर कमी; पण तीच पॅकबंद करून विकली, तर कर जास्त! अशा अनेक अर्थशून्य तरतुदी जुन्या पद्धतीत होत्या. संबंधित उत्पादक आणि विक्रेते त्या विरोधात सतत तक्रारी करत होते. पण, त्याची दखल घेतली गेली नाही. जीएसटीच्या धोरणात आणि आकार पद्धतीत आमूलाग्र सुधारणा करताना त्याचा विचार झाला याबद्दल म्हणूनच आता समाधान व्यक्त होतं आहे. कर भरण्याची प्रक्रिया आणि परताव्याची मागणी यातही सुरुवातीला खूपच क्लिष्टता होती. परताव्याच्या मागण्या कितीतरी महिने तशाच पडून राहत होत्या. उलट, करभरणा करण्यास काही तासांचा विलंब झाला, तरी कर विभागाच्या नोटिसा येऊन धडकत होत्या. देशातला उत्पादक किंवा व्यापारी जमाखर्च किंवा ताळेबंदाचा तज्ज्ञ नाही. त्याची सगळी शक्ती व्यापाराचं व्यवस्थापन आणि वृद्धीसाठी लागलेली असते. त्यामुळे, कर भरण्याची तांत्रिकता, त्यासाठी आवश्यक संगणकीय ज्ञानाची गरज याने तो पुरता त्रस्त झाला होता. 'जीएसटी प्रणाली ही सरकार किंवा व्यापाऱ्यांपेक्षा सनदी लेखापालांच्याच हिताची आहे' अशी टीका त्यामुळेच झाली होती. पण, सर्व्हरबाबतच्या अडचणी, सतत बदलणारे नियम यामुळे खरं तर सनदी लेखापालही मेटाकुटीला आले होते. जीएसटी ०.२ ने याबाबतीत किती सुलभता आणली आहे, हे अद्याप स्पष्ट नाही. पण, सरकारच्यावतीने केल्या गेलेल्या निवेदनाचा सूर पाहता याबाबतच्या आवश्यक सुधारणाही केल्या असतील, अशी आशा आहे. कर आकारणी, कर भरणा आणि कर विभागाकडून होणारी तपासणी यात तफावत आली, तर दाद कुठे मागायची? हाही प्रश्न होता. विशेषतः राष्ट्रीय पातळीवर. राज्या-राज्यांतील करांच्या दरफरकातील त्रास मोठ्या उत्पादकांना सहन करावा लागत होता. २०२५ च्या अखेरीपर्यंत राष्ट्रीय पातळीवर अशा अपिलीय न्यायाधीकरणाचं कार्यान्वयन करण्याचं आश्वासन त्यादृष्टीने खूपच महत्त्वाचं ठरणार आहे.बहुतांश जीवनावश्यक बाबींच्या करश्रेणीत बदल होणार असल्याने कर घटणार आहेत. परिणामी सरकारच्या उत्पन्नातही घट होणार आहे. अर्थ विभागाच्या अंदाजानुसार सुरुवातीला ही घट सुमारे ४७ हजार कोटी रुपयांची असेल. भारताच्या अर्थव्यवस्थेचा एकूण आकार बघता ही घट अगदी किरकोळ आहे. दुसरं, कर कमी झाल्याने खरेदी-विक्रीत जी वाढ होईल आणि वाढत्या उलाढालीने जे अधिक कर उत्पन्न मिळेल, त्यात ही घट भरून निघेल, असाही अर्थ विभागाचाच विश्वास आहे. विरोधी पक्षांची सरकारं असलेल्या राज्यांनी आर्थिक वर्षाच्या अधेमधे केलेल्या या कर कपातीबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. विद्यमान दराने कर उत्पन्न गृहीत धरून राज्यांनी आपले अर्थसंकल्प बेतले असल्याने त्यांचं सगळंच गणित बिघडेल, अशी तक्रार आहे. पण, वाढत्या व्यवहारांचा फायदा त्यांनाही मिळेलच. घट फार राहणार नाही. बाजाराला नवसंजीवनी देण्यासाठी सरकारने त्यांचं कर्तव्य केलं आहे. पुढची जबाबदारी आता उत्पादक आणि विक्रेत्यांची आहे. कर कपातीचा फायदा त्यांनी ग्राहकाला दिला पाहिजे. 'ग्राहकांचा संतोष हाच आमचा फायदा' हे ब्रीद तेव्हांच खरं होईल.

# राष्ट्रवादी काँग्रेसचे १९ सप्टेंबरला चिंतन शिबिर नागपूरमध्ये; प्रदेशाध्यक्ष तटकरे यांची माहिती

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने शुक्रवार दिनांक १९ सप्टेंबर २०२५ रोजी नागपूर येथे चिंतन शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.या शिबिरामध्ये पक्षाचे वरिष्ठ नेते, मंत्री, आजी - माजी आमदार, आजी - माजी खासदार, सर्व सेलचे प्रदेशाध्यक्ष, सर्व जिल्हाध्यक्ष, राष्ट्रीय कार्यकारिणीचे नेते यांचा समावेश असणार आहे. युवकांचे बदलत्या आकांक्षांचे प्रश्न, समाजातील विविध घटकांच्या अपेक्षा तंत्रज्ञान आणि समाज, युवकांची जीवनशैली आणि अपेक्षा, या गोष्टींना सामोरे जाण्याचे धोरण नव्याने विकसित करण्याचा



प्रयत्न या चिंतन शिबिरात केला जाणार आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात असलेल्या गावात प्रत्येक घरात पक्षाची विचारसरणी, भूमिका आणि योजना पोचवण्याचा धोरणावरही या चिंतन शिबिरात सांगोपांग चर्चा केली जाणार आहे असेही सुनिल तटकरे यांनी स्पष्ट केले.मूल्याधिष्ठीत पण आधुनिक गरजांना प्रतिसाद देणारी भविष्यकालीन राष्ट्रवादी घडवणे हे या शिबिराचे मुख्य ध्येय आहे. पक्षाचे हे निव्वळ शिबिर नसून महाराष्ट्र आणि देशाच्या राजकीय भविष्याला आकार देणारा एक महत्त्वाचा टप्पा राष्ट्रवादी काँग्रेसच्या आकाराच्या जडणघडणीत राजकीय प्रवासाचा ठरणार आहे असेही सुनिल तटकरे म्हणाले. या चिंतन शिबिरात जे राज्यव्यापी धोरण निश्चित करु त्यानंतर पत्रकार परिषद घेऊन विस्तृत चर्चा आणि आगामी काळातील रणनीती याबाबतची सुरुवात कधी करणार आहोत हे योग्य वेळी सांगणार आहोत असेही सुनिल तटकरे यांनी सांगितले.या पत्रकार परिषदेला राष्ट्रवादी काँग्रेसचे कोषाध्यक्ष आमदार शिवाजीराव गर्जे, प्रदेश प्रवक्ते संजय तटकरे, मुंबई कार्याध्यक्ष सिध्दार्थ कांबळे, प्रदेश सरचिटणीस लतिफ तांबोळी आदी उपस्थित होते.

# अत्याधुनिक युगात १०० टक्के साक्षर होणे गरजेचे

१९६५ मध्ये ८ ते १९ सप्टेंबर दरम्यान इराणची राजधानी तेहरान येथे जगभरातील शिक्षणमंत्र्यांची एक बैठक झाली. यानंतर १९६६ साली संयुक्त राष्ट्रसंघाने शिक्षणप्रणालीमध्ये जागरूकता वाढावी याउद्देशाने ८ सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. तेव्हापासुन जगभरात ८ सप्टेंबरला दरवर्षी साक्षरता दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.म्हणजेच देशाची प्रगती असो वा स्वतःची प्रगती असो शिक्षण अत्यंत महत्त्वाचे असते.हाच उद्देश साक्षरतेचा आहे.कारण यातुनच आयुष्याची जडणघडण निर्माण होते व मन्युष्य घडतो.आज अनेक देश प्रगतीपथावर आहेत.परंतु आफ्रिका आणि आशिया खंडात साक्षरतेचे प्रमाण कमी दिसून येते.याचे मुख्य कारण म्हणजे अशिक्षितपणा, बेरोजगारी,भुकमरी, कुपोषण व जंगली जीवन आहे.आजही भारतसुध्दा पुर्णपणे साक्षर नाही.याकरीता सरकारला मोठे अभियान चालविण्याची गरज आहे.भारत सध्याच्या परिस्थितीत फक्त ६० टक्के साक्षर आहे.देशात साक्षरतेच्या अभावामुळेच शेतकऱ्यांच्या आत्महत्यां होत आहे.त्या थांबविण्याचा संकल्प ८ सप्टेंबरला घेऊन साक्षरता अभियान युध्दपातळीवर व्हायला पाहिजे.कारण बदलत्या काळानुसार १०० टक्के साक्षर होणे गरजेचे आहे.भारतातील केरळ हे असे एकमेव राज्य आहे की ते १०० टक्के साक्षर आहे.आजच्या परिस्थितीत ज्या देशात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे तो देश मागासलेल्या देशाच्या रांगेत येतो. भारतातील आदीवासी भाग व अती दुर्गम भाग अजून पर्यंत साक्षर नाहीत.त्यामुळे त्यांना अनेक कठीण प्रसंगांचा सामना करावा लागतो.साक्षरतेच्या अभावामुळे देशातील अनेक दुर्गम भागातील राज्यात नक्षलवादाचा किंवा गुन्हेगारांचा जन्म होतो.अती दुर्गम भागात पोषक आहाराची व योग्य शिक्षणाची गरज आहे अन्यथा येथुनच कुपोषण,भुकमरी, वाममार्ग व आत्महत्येचा उदय होत असतो.भारतातील वाढती लोकसंख्या ही साक्षरतेच्या अभावामुळेच निर्माण झालेली मोठी समस्या आहे.भारतातील वाढत्या लोकसंख्येमुळे धर्मा-धर्मात कटुता निर्माण होते आणि धर्माच्या नावावर लोकसंख्या वाढवीण्याची शर्यत लागते. यामुळेच भारताला लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी मोठी अडचण निर्माण होत आहे. भारतातील वाढती लोकसंख्या नियंत्रीत ठेवण्यासाठी भारताने साक्षरता अभियान युध्दपातळीवर राबवायला हवे.जगातील अनेक देश प्रगतीपथावर आहेत.आज प्रत्येक देशाजवळ मोठ्या प्रमाणात दारुगोळा आणि अत्याधुनिक शस्त्रसामग्रीचा साठा आहे.परंतु जर तो देश साक्षर नसेल तर काय फायदा असे देश मागासल्यामध्ये गणल्या जातात.आज पाकिस्तान फक्त २० टक्के साक्षर आहे.त्यामुळे तो गेल्या ७८ वर्षाच्या काळात तो कवडीचीही प्रगती करू शकला नाही.पाकिस्तानने फक्त आतंकवाद्यांना खतपाणी घालण्याचे काम केले व आताही करीत आहे व याचा परिणाम आज संपूर्ण पाकिस्तान रक्ताच्या लाथोळ्यात लथफतलेला दिसून येतो.त्यामुळेच आज पाकिस्तानाच्या हातात भिकेचे ढोबर दिसून येते व आजच्या परिस्थितीत पाकिस्तान जगातील आतंकवाद्यांचे माहेरघर बनले आहे. जगातील प्रत्येक देशांनी ८ सप्टेंबर आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचे औचित्य साधून प्रत्येक देशांनी साक्षरता अभियान युध्दपातळीवर चालवायला पाहिजे. यामुळे देश प्रगतीपथावर येईल.आजच्या यांत्रिकी युगात युवावर्ग मोबाईलमध्ये गर्क असतो.त्यामुळे नवीन नवीन अनेक व्याधी निर्माण होवू शकते याला नाकारता येत नाही.याकरिता साक्षरतेच्या माध्यमातून जनजागृती करून मोबाईल पासून होणाऱ्या नुकसानाबद्दल सूध्दा जागृती करणे आज गरजेचे आहे.आज स्वीडनमध्ये दोन वर्षांखालील मुलांना मोबाइल, टीव्ही पाहण्यास बंदी घालण्यात आली आहे.देशाच्या सार्वजनिक आरोग्य संस्थेच्या मते स्क्रीनचा वापर शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम करत असल्याने लहान मुलांना डिजिटल मीडिया आणि टेलिव्हिजनपासुन पूर्णपणे दूर ठेवले पाहिजे.हा संपूर्ण परीणाम साक्षरतेच्या अभावामुळे निर्माण झाल्याचे दिसून येते.साक्षरता म्हणजे फक्त शिक्षण नसुन आपुलकी,खान-पाण, रहाणीमान,देशाचा विकास, पारिवारिक सुख-दु:ख, सुविधा, परिपक्कता,संस्कृती, आरोग्याची काळजी, सोशल मिडियापासुन लहान मुलांवर होणारे दुष्परिणाम ह्या संपूर्णबाबी साक्षरतेमध्ये मोडत असतात.आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसलेले आहे.त्यामुळे पृथ्वी नष्ट व्हायला काहीच वेळ लागणार नाही. आज जगात महाप्रलय, भुकंप, सुनामी, अतिउष्णता, अतिथंडी, ज्वालामुखीचा उद्रेक ह्या संपूर्ण विनाशकारी घटना मानवाने स्वतःहून ओढवल्या आहेत. जगात सध्याच्या परिस्थितीत जंगल तोड मोठ्या प्रमाणात सुरू आहे यामुळे पृथ्वीतलावरील सर्वांचा जीव धोकादायक स्थितीमध्ये आल्याचे दिसून येते. ह्या सुध्दा साक्षरतेच्या अभावामुळेच निर्माण झालेल्या समस्या आहेत. आंतराष्ट्रीय साक्षरता दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात साक्षरता अभियान छेडुन मानवजाती, जिवजंतु, पर्यावरण व निसर्ग यांना वाचविले पाहिजे.कारण मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे त्यामुळे तो स्वतःच्या स्वार्थासाठी कोणत्याही स्तरावर जात असतो अशा परिस्थितीत तो मागचा-पुढचा कुठलाही विचार करीत नाही व याचा दुष्परिणाम संपूर्ण मानवजातीला व जीवसृष्टीला भोगावा लागतो. ह्या संपूर्ण बाबी साक्षरतेच्या अभावामुळे निर्माण झाल्याचे दिसून येतो.त्यामुळे साक्षरतेमध्ये सर्वच स्तरातून विचार व्हायला हवा.म्याझॉनसारखे जंगल जळने,वनवे लागले, महाप्रलय येणे हे सर्व साक्षरतेच्या अभावामुळे निर्माण झालेली परिस्थिती आहे असे मला वाटते. निसर्गाचे वाटोळे मानवाने केले, जंगल संपदा मानवाने नष्ट केली, नवीन-नवीन समस्या मानवाने निर्माण केल्या यामुळेच आज पृथ्वी भयभीत आहे.मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी पृथ्वीच्या पोटातील संपूर्ण पाणी निचोडुन टाकले यामुळेच आज अनेक देश पीण्याच्या पाण्यासाठी रेडझोनमध्ये आल्याचे दिसून येते.याला साक्षरतेच्या माध्यमातून जनजागृती करून वाचविले पाहिजे.याकरिता जगातील प्रत्येक देशांना युध्दपातळीवर प्रयत्न करण्याची गरज आहे.आज प्रत्येक देश युद्धासाठी सज्ज आहे त्यापध्दतीने प्रत्येक देशांनी आपली तयारी केली आहे.म्हणजे जग आज तिसऱ्या महायुध्दाच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचले आहे.याला साक्षरता अभियानाच्या माध्यमातून थांबविले पाहिजे. जगातील प्रत्येक देशांनी प्रगती अवश्य करावी.परंतु मानवजातीच्या कल्याणासाठी व जे निसर्गाच्या सानिध्यात रहातात (पशुपक्षी,वण्यप्राणी)त्यांच्यावर कोणताही प्रकारचा अन्याय होणार नाही याचीही काळजी घेतली पाहिजे. यातच आपल्या खरा आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस दिसून येईल. चारित्र्य बनविण्यासाठी, चांगलेव्यक्तीत्व निर्माण करण्यासाठी जो कोणी प्रयत्न करेल तोच खरा साक्षरतेचा भागीदार आहे.८ सप्टेंबर आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवसाचे औचित्य साधून जगभरातील प्रत्येक देशांनी साक्षरता अभियानासोबत बदलत्या हवामानावर मात करण्यासाठी वृक्षलागवड अभियान युध्दपातळीवर चालवायला पाहिजे. यामुळे निसर्ग प्रफुल्लित रहाण्यास मोठी मदत होईल.

**-रमेश कृष्णराव लांजेवार**

# शिक्षकांनी ज्ञानदानातून सक्षम पिढी घडवून विकसित भारताची संकल्पना साकार करावी-प्रा.राम शिंदे

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सुसंस्कार व नवी दिशा देण्याचे काम शिक्षक करतात. विकसित भारताची संकल्पना साकारण्यासाठी शिक्षकांनी ज्ञानदानातून सक्षम पिढी घडवावी. शिक्षण क्षेत्रात जिल्हा राज्यात अव्वल राहण्यासाठी अधिक प्रयत्न करा, असे आवाहन विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले.



शहरातील द्वारका लॉन्स येथे जिल्हा परिषदेच्या वतीने देण्यात येणाऱ्या सन २०२२, २०२३ व २०२४ या वर्षातील जिल्हा शिक्षक पुरस्कार वितरण समारंभाप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार काशिनाथ दाते, आमदार विक्रमसिंह पाचपुते, आमदार विठ्ठलराव लंघे, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर पाटील, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) संध्या गायकवाड, दिलीप भालसिंग, अनिल मोहिते, विनायक देशमुख आदी उपस्थित होते.

सभापती प्रा. राम शिंदे म्हणाले, विद्यार्थ्यांच्या मनाची व विचारांची ज्योत प्रज्वलित करणारे, त्यांच्या कलागुणांना वाव देणारे, विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करणारे हे शिक्षकच असतात. नवीन पिढी घडविण्याचे कामही शिक्षक करत असतात. यामुळेच समाजामध्ये शिक्षणाला अधिक महत्त्व आहे. ग्रामीण भागामध्ये शिक्षण व समाजजीवन हे दीपस्तंभ ठरते. गावातील सामाजिक क्रांती घडविण्याचे कार्य ज्ञानदानातून शिक्षक करत असतात. समाजामध्ये शिक्षकांना मोठा मान आहे. नवी पिढी घडविण्याचे काम शिक्षकांमार्फत होत असल्याने समाजाचे शिल्पकार हे शिक्षकच आहेत. शिक्षण हे केवळ करिअर घडविण्याचे साधन नसून जीवन जगण्याची दिशा देणारी प्रक्रिया आहे. नव्या शैक्षणिक धोरणामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण मिळण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे शिक्षकांनी आपले ज्ञान व अध्यापन पद्धती अद्ययावत ठेवली पाहिजे. राज्यात शिक्षणक्षेत्रात जिल्हा ५ व्या क्रमांकावर आहे. जिल्हा राज्यात अग्रेसर रहावा, यादृष्टीने सर्वंकष प्रयत्न करण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

पालकमंत्री डॉ.विखे पाटील म्हणाले, विविध आव्हाने समर्थपणे पेलून, शिक्षण परिघाच्या पलीकडे जाऊन शिक्षकांनी प्रयोगशीलतेतून ज्ञानदान केले व त्यामुळे जिल्ह्याचा नावलौकिक राज्यभर वाढवला. ही बाब जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे. शिक्षक हा राष्ट्र व समाजाच्या उत्कर्षाच्या प्रक्रियेतील प्रमुख घटक आहे. शाळांतून दिलेल्या ज्ञानदानातूनच राष्ट्र व समाजाच्या भवितव्याची दिशा तरुण पिढी ठरवणार आहे. ज्ञानाचा कक्षा रुंदावतांना शिक्षक विद्यार्थ्यांसाठी शिडी धरतात व विद्यार्थी उद्याची वाटचाल करतात. शिक्षकांशिवाय राष्ट्राची व समाजाची प्रगती अशक्य असल्याने ज्ञानाची साधना अखंडपणे सुरू ठेवण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले. आजघडीला आधुनिक तंत्रज्ञानावरील शिक्षणाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. शैक्षणिक पद्धतीमध्ये होणाऱ्या बदलांचे शिक्षकांपुढे मोठे आव्हान असून शिक्षकांची जबाबदारी अधिक वाढली आहे. ज्ञानाने समृद्ध झालेला आपला देश असून या ज्ञानदानाचे काम अत्यंत समर्पित भावनेतून शिक्षकांकडून व्हावे, अशी अपेक्षाही श्री.विखे पाटील यांनी यावेळी व्यक्त केली.आमदार विक्रमसिंह पाचपुते म्हणाले, जिल्ह्याच्या अनेक खासगी संस्थेमधून जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे व हे केवळ शिक्षकांमुळे शक्य झाले आहे. केवळ विद्यार्थ्यांना शिक्षण देणे एवढेच शिक्षकांचे कार्य नसून समाजाला साक्षर व सुशिक्षित करण्याची जबाबदारीही शिक्षकांचीच असल्याचेही ते म्हणाले. आमदार काशिनाथ दाते म्हणाले, खासगी शाळांच्या तुलनेत जिल्हा परिषदांच्या शाळांमधून अधिक दर्जेदार शिक्षण मिळत आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांतील अनेक विद्यार्थी प्रशासनामध्ये मोठ्या पदावर काम करत असून ही अत्यंत भूषणावह बाब असल्याचे ते म्हणाले.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया म्हणाले, अत्यंत दुर्गम भागात शाळा असतानाही येणारी आव्हाने पेलून समाजातील गोरगरीबांच्या पाल्यांना शिक्षणदानाचे मोठे कार्य शिक्षकांमार्फत केले जाते. शिक्षकांच्या या कामातून इतरांनीही प्रेरणा घ्यावी. शाळांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा नियोजन समितीमधून आवश्यक निधी दिला जाईल, असेही ते म्हणाले.

प्रास्ताविकात आनंद भंडारी म्हणाले, जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या ३ हजार ५३४ प्राथमिक शाळांच्या माध्यमातून २ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विविध उपक्रम राबवत या शाळांच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यावर भर दिला जात आहे. मिशन आपुलकी, मिशन आरंभ हे उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबवले जात असून याद्वारे जिल्हा परिषदेच्या शाळांची गुणवत्ता उंचावत आहे. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून शाळांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. जिल्हा शिक्षक पुरस्कारांची निवड उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांची अत्यंत पारदर्शकपणे करण्यात आली आहे.

यावेळी सन २०२२, २०२३ व २०२४ या वर्षातील जिल्हा शिक्षक पुरस्कारांचे मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले. कार्यक्रमास पदाधिकारी, अधिकारी यांच्यासह शिक्षक व शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीड-परळी रेल्वेमार्गाच्या भूसंपादनास गती द्या-जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील रेल्वे प्रकल्पाला गती देण्यासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी संबंधित विभागांना भूसंपादनाची प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी बीड-अहिल्यानगर दरम्यान रेल्वे गाडी सुरू होणार असून त्यानंतर बीड-परळी वैजनाथ मार्गाची कामेही वेगाने होणार आहेत.जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत भूसंपादनातील अडथळे तातडीने दूर करण्यावर भर देण्यात आला. उपविभागीय अधिकारी कविता जाधव, सहायक कार्यकारी अभियंता मुकुंद पु. नाईक, वरिष्ठ अभियंता सुरेश कुमार मंडल आदी अधिकारी उपस्थित होते. दूरदृश्य प्रणालीद्वारे उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, वसीमा शेख व गौरव इंगोले यांनी सहभाग घेतला.जॉन्सन यांनी सांगितले की, प्रलंबित भूसंपादन प्रकरणे



समन्वय साधून निकाली काढावी व आवश्यक जमीन लवकर उपलब्ध करून द्यावी. राष्ट्रीय राज्यमार्ग विभागाने ब्रम्हवाडी येथील उड्डाणपूलाचे काम त्वरीत सुरू करावे, असेही त्यांनी नमूद केले. सर्व उपविभागीय अधिकाऱ्यांना भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करून अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.दरम्यान, जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी बीड रेल्वे स्थानकाला भेट देत येथील सुविधांची पाहणी केली. १७ सप्टेंबर रोजी होणाऱ्या बीड-परळी रेल्वेमार्गाच्या उद्घाटनाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक नियोजनाचे निर्देश दिले. यावेळी परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले.पाहणीदरम्यान उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार चंद्रकांत शेळके, उपमुख्य अभियंता डी. डी. लोळगे, कार्यकारी अभियंता लोकेंद्र कुमार सिंग, वरिष्ठ अभियंता एल. पी. नायक, अमरकुमार अकेला व सुरेश कुमार मंडल उपस्थित होते.

# हैदराबाद गॅझेट लागू करत बंजारा समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश करा-संतोष पवार

**बीड । प्रतिनिधी**

नुकताच महाराष्ट्र शासनाने ऐतिहासिक निर्णय घेत, हैद्राबाद गॅझेट लागू करत मराठा समाजाकरिता ओबीसी आरक्षण दिले, त्या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो, मराठी समाजाला न्याय मिळाला याचा आम्हाला आनंद आहे ,आता आम्हालाही न्याय मिळाला पाहिजे हैद्राबाद गॅझेट मध्ये बंजारा समाज हा अनुचित जमातीमध्येच मोडला जातो असा स्पष्ट उल्लेख आहे आणि खरोखरच बंजारा हा मागास आहे, त्याकरिता महाराष्ट्र शासनाने जसा मराठा समाजाकरिता निर्णय घेत हैद्राबाद गॅझेट लागू केले त्याच पद्धतीने आता बंजारा समाजाकरिताही हैद्राबाद गॅझेट लागू करत बंजारा समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश करावा याकरिता वडवणीतील बंजारा समाज आक्रमक झाला असून आज वडवणी तहसील कार्यावर बंजारा युवाशक्तीचे संस्थापक अध्यक्ष संतोष भैय्या पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शेकडो बंजारा समाजाचे कार्यकर्ते धडकले




व एक दिवशी लाक्षणिक उपोषणाचा इशारा दिला.

याविषयी अधिक माहिती अशी की, हैद्राबाद गॅजेट लागू करुन मराठवाडयातील आणि राज्यातील बंजारा समाजाचा एस टी प्रवर्गात समावेस करावा या न्यायमागणीसाठी दि. ०८/०९/२०२५ रोजी सोमवार या दिवसी एक दिवशीय उपोषण संबंध वडवणी तालुक्यातील बंजारा समाजाच्या वतीने उपोषन करण्यात येणार आहे. बंजारा समाज आनेक राज्यात वेगवेगळ्या राज्यात राहतो पण बंजारा समाजाचा पेहेराव बोली भाषा, रहाणी माण, रोटी बेटी व्यवहार एकच असून मग महाराष्ट्राच्या बंजारा समाजावर अन्याय का? आद्राप्रदेश मध्ये बंजारा समाज हा एस.टी. प्रवर्गामध्ये तर कर्णनाटक राज्यामध्ये बंजारास समाज एस.सी.मध्ये असा दुजा भाव का या साठी शासनानी याची दखल घेवून हैद्राबाद गॅजेट महाराष्ट्रात राहणाऱ्या बंजारा समाजाला एस. टी. प्रवर्गामध्ये सामील करण्यात यावा याकरिता शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी लाक्षनीक उपोषन आम्ही करीत आहोत, असे निवेदन देण्यात आले या निवेदनावर यांच्या स्वाक्षऱ्या असून यावेळेस शेकडो बंजारा समर्थक उपस्थित होते.

# मुख्यमंत्री होण्यासाठी अजित पवारांचे गणपती बाप्पाला साकडे

**पुणे (वृत्तसंस्था)**-बाप्पा सर्वांच्याच इच्छा पूर्ण करतो, असे मानले जाते. त्यामुळेच महाराष्ट्रातच नव्हे तर जगभरात गणेश उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज भल्या पहाटे पुण्यातील श्रीमंत दगडुशेठ हलवाई गणपतीची पूजा व अभिषेक केला. प्रत्येकाच्या मनातील इच्छा पूर्ण होवो, असे साकडे आपण बाप्पाला घातले असल्याचे अजित पवार यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. या माध्यमातून अजित पवार यांनी गणपती बाप्पाला मुख्यमंत्री होण्यासाठी साकडे घातले का? याची चर्चा सुरू झाली आहे.मुख्यमंत्री होण्यासाठी बाप्पाला साकडे घातले का? असा प्रश्न उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पत्रकारांनी विचारला होता. यावर उत्तर देताना अजित पवार यांनी देखील तुमच्या मनात जे आहे ते पूर्ण होवो, तसेच प्रत्येकाच्या मनातील इच्छा पूर्ण होवो. अशी प्रार्थना आपण बाप्पा चरणी केली असल्याचे म्हटले आहे. पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरातील गणेशाची पूजा व अभिषेक अजित पवार यांनी आज सकाळी केला. यानंतर त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला, यावेळी ते बोलत होते.गणेशोत्सवाचे दहा दिवस बघता-बघता कसे निघून गेले हे कोणाच्याही लक्षात आले नाही. इतके सगळे तल्लीन होऊन गणेशोत्सवात सहभागी झाले होते. आजच्या अखेरच्या दिवशी देखील वेळेमध्ये गणेश विसर्जन व्हावे, यासाठी सर्वांनी मदत करावी, सहकार्य करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे. तुमच्या मनात जे आहे ते तुमच्या मनासारखे होवो. इतरांच्या मनात जे आहे ते त्यांच्या मनासारखे होवो. अशीच मागणी आपण दगडूशेठ हलवाई गणपती चरणी केली असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे.गणेश विसर्जन निमित्त दगडुशेठ गणपती हलवाई गणपती ट्रस्टच्या वतीने मला अभिषेक करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. त्यानुसार अभिषेकासाठी सकाळीच या ठिकाणी मी आलो. या ठिकाणी अभिषेक केला आहे. सर्वच ठिकाणी सुख शांती नांदावी, अशी प्रार्थना यावेळी गणरायांना केली. प्रत्येकाच्या मनामध्ये इच्छा, आकांक्षा असतात. त्या पूर्णत्वाला जाव्यात, अशी प्रार्थना केली. आपला फुले- शाहू- आंबेडकरांचा महाराष्ट्र सुजलाम सुफलाम व्हावा, अशी मागणी बाप्पा चरणी केली असल्याचेही अजित पवार यांनी म्हटले आहे.राज्यातील काही भागामध्ये जास्त पाऊस पडला आहे. त्यामुळे तेथील शेतकरी बळीराजा अडचणीत आहे. शेतकरी या संकटातून बाहेर पडण्यासाठी शासन देखील प्रयत्नशील आहे. अतिशय आनंदात गणेशोत्सवाचे नऊ दिवस गेले आहेत. आजचा दहावा दिवस देखील कुठेही गालबोट न लागू देता सर्वांनी मिरवणूक शांततेत पार पाडावी. त्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे. कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस त्यांची जबाबदारी पार पाडत आहेत. तसेच जबाबदार नागरिकांनी देखील आपापले काम योग्य पद्धतीने पार पाडावे. आज गणेश विसर्जन शांततेत होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.



# ठाणे महापालिका क्षेत्रात अनंत चतुर्दशी ला ९८६१ गणेश मूर्तींचे विसर्जन

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची विसर्जन घाटांना भेट

**ठाणे । प्रतिनिधी**

अनंत चतुर्दशीला ठाणे महापालिका क्षेत्रातील विसर्जनस्थळांवर एकूण ९८६१ गणेश मूर्तींचे महापालिकेच्या सुव्यवस्थित नियोजनामध्ये विसर्जन संपन्न झाले. त्यापैकी ५३९० मूर्ती पीओपीच्या तर, ४४७१ मूर्ती शाडू मातीच्या होत्या. त्यात, सहा फुटांपेक्षा मोठ्या पीओपी मूर्तींची संख्या १८८ इतकी होती. तर, पर्यावरणपूरक मोठ्या मूर्तींची संख्या ३२२ इतकी होती. अकराव्या दिवशी सार्वजनिक मंडळाच्या ३७२ गणेश मूर्तीही विसर्जित करण्यात आल्या. पर्यावरणाभिमुख गणेशोत्सवाची परंपरा यशस्वीपणे राबविणा-या ठाणे महापालिकेच्या वतीने निर्माण करण्यात आलेल्या कृत्रीम तलावांमध्ये अकराव्या दिवशी ६६९९ मूर्ती तर, विशेष टाकी व्यवस्थेत १४७९ गणेश मूर्तींचे भाविकांनी विसर्जन केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शहरात मासुंदा तलाव, कोपरी येथील विसर्जन घाट आणि पारसिक विसर्जन घाट येथे भेट देऊन तिथे पुरवण्यात आलेल्या सोयी सुविधांची पाहणी केली आणि गणेश भक्तांशी संवाद साधला.



यावेळी खासदार नरेश म्हस्के, माजी महापौर अशोक वैती, महापालिका आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरीक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, उपायुक्त मनीष जोशी, जी. जी. गोदेपुरे, शंकर पाटोळे, कार्यकारी अभियंता मोहन कलाल आदी उपस्थित होते. दरम्यान, महापालिकेने तयार केलेल्या विसर्जन व्यवस्थेला ठाणेकर नागरिकांनी दिलेल्या उदंड प्रतिसादाबद्दल महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी सर्व गणेश भक्तांचे आभार मानले आहेत. विसर्जन व्यवस्थेत महापालिका आणि पोलीस प्रशासन यांच्याबरोबरीने महाविद्यालयांचे विद्यार्थी, स्वयंसेवी संघटनांचे स्वयंसेवक, सामाजिक संस्था आदींचे प्रतिनिधी, पोलीस मित्र करण्यासाठी सहभागी झाले होते. या सगळ्यांचे सहकार्य आणि भाविकांनी केलेले शिस्तबद्ध विसर्जन यामुळे गणेश मूर्तींचे विसर्जन जल्लोषात झाले. रविवारी सकाळी ७.३० च्या सुमारास सार्वजनिक गणेश मंडळाच्या अखेरच्या मूर्तीचे विसर्जन करण्यात आले.

## पनवेल तहसीलदार श्री.विजय पाटील यांचे निलंबन

# आपल्या पदाचा वापर मोठ्या प्रमाणात गैर व्यवहार समोर

**पनवेल । प्रतिनिधी**

मे. मेरेथॉन पनवेल इन्फास्ट्रक्चर प्रा.लि. यांनी पनवेल तालुक्यातील मौजे वारदोली, पोयंजे, भिंगारवाडी, भिंगार, पाली बुद्रुक व मौजे भेरले येथील जमिनी या महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ६३ एक-अ मधील तरतूदीन्वये खऱ्या खुऱ्या औद्योगिक प्रयोजनासाठी सन २००७ मध्ये खरेदी केल्या होत्या, त्यामुळे सदर जमिनींवर कलम ६३ एक-अ मधील तरतूदीन्वये कार्यवाही करणे अपेक्षित असताना, श्री. विजय पाटील, तहसिलदार, पनवेल यांनी सदर बाबीकडे जाणीवपूर्वक अक्षम्य दुर्लक्ष करुन कलम ६३ एक-अ मधील तरतुदींचा भंग करुन, सदर जमिनींना अकृषिक सनद देण्याची अनियमितता केल्याने राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानसार तहसीलदार विजय पाटील यांना निलंबित करण्यात आले आहे. शासनाच्या निदर्शनास आले आहे. श्री. पाटील यांची सदर कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ३ चे उल्लंघन करणारी आहे. सबब, श्री. विजय पाटील, तहसिलदार, पनवेल यांच्याविरुध्द



महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील तरतुदीअन्वये त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही करण्याच्या अधिनतेने त्यांना निलंबित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम ४ (१) (अ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन आता श्री. विजय पाटील, तहसिलदार, पनवेल यांना तात्काळ प्रभावाने शासन सेवेतून निलंबित करण्यात आले. निलंबन असेपर्यंत श्री. विजय पाटील, तहसिलदार, यांचे निलंबन कालावधीतील मुख्यालय जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड येथे असेल व त्यांनी जिल्हाधिकारी, रायगड यांच्या पूर्व संमत्तीशिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

निलंबनाच्या कालावधीत श्री. विजय पाटील, तहसिलदार यांनी खाजगी नोकरी स्वीकारू नये किंवा धंदा वा व्यापार करू नये. (त्यांनी तसे केल्यास ते दोषारोपास पात्र ठरतील व त्या अनुषंगाने त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल) व तसे केल्यास ते निलंबन निर्वाह भत्ता गमाविण्यास पात्र ठरतील. निलंबनाच्या कालावधीत निलंबन भत्ता देण्यात येईल त्या प्रत्येक वेळी आपण खाजगी नोकरी स्वीकारलेली नाही किंवा कोणताही खाजगी धंदा वा व्यापार करीत नाही अशा त-हेचे प्रमाणपत्र श्री. विजय पाटील यांना द्यावे लागेल. महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ च्या नियम ६८ मधील तरतुदीनुसार श्री. विजय पाटील, तहसिलदार यांना निलंबन निर्वाह भत्ता व इतर पूरक भत्ते देण्यात येतील.

# महाविद्यालये सामाजिक परिवर्तनाची केंद्र व्हावेत-प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील

**केज । प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था आडस संचलित बाबुरावजी आडसकर महाविद्यालय केज व मराठवाडा साहित्य परिषद शाखा केज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वाड्मय मंडळ उद्घाटन व नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणां मध्ये भाषेचे योगदान या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे उद्घाटक प्राचार्य कौतिकराव ठाले-पाटील केंद्रीय अध्यक्ष मराठवाडा साहित्य परिषद छत्रपती संभाजीनगर हे उपस्थित होते. उद्घाटनपर मार्गदर्शना मध्ये बोलत असताना त्यांनी मराठी भाषेला केंद्र सरकारने दिलेला अभिजात भाषेच्या दर्जा याविषयी वास्तव व त्यातील दिशाभूल याविषयी आपले मत प्रकट केले. भाषा हे मानवाच्या अभिव्यक्ती चे माध्यम आहे.नवीन शैक्षणिक धोरण २०२० याविषयी बोलत असताना परिसंवादाचे प्रमुख व्याख्याते प्राचार्य कमलाकर कांबळे सरांनी भाषेचे महत्त्व व नवीन शैक्षणिक धोरणा मध्ये वाड्मय मंडळ व भाषा विभागांचा सहभाग विद्यार्थ्यांच्या



सर्वांगीण विकासासाठी फार महत्वाचा आहे या संबंधी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे उद्घाटक प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील,प्रमुख पाहुणे श्री.दादा गोरे, श्रीमान आतकरे व प्राचार्य कमलाकर कांबळे सर हे होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य माधव फावडे सर यांनी विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त महाविद्यालय व शालेय स्तरावरहोणाऱ्या उपक्रमामध्ये सहभागी होऊन अध्ययन अध्यापन प्रक्रिया सुलभ करण्यास मदत करावयास पाहिजे या विषयी आपले मतव्यक्त केले.या कार्यक्रमामध्ये बाबुरावजी आडसकर महाविद्यालय केज, भाषा विभाग यांच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय वक्तृत्व व निबंध स्पर्धेच्या विजेत्यांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमासाठी प्रमुख निमंत्रित सुरेश शिनगारे,चेअरमन वसंत पतसंस्था केज,श्री. बाळासाहेब लोखंडे मसाप केजकार्यकारणी सदस्य,श्री.धेडे सर प्राचार्य वसंत कनिष्ठ महाविद्यालय केज तसेच भाई मोहन गुंड सामाजिक कार्यकर्ते व शेकाप चळवळीतील अग्रगण्य व्यक्तिमत्व उपस्थित होते. कार्यक्रमाचेसूत्रसंचालन प्रा.डॉ.प्रशांत क्षीरसागर व प्रास्ताविक प्रा.डॉ. नवनाथ काशीद यांनी केले.कार्यक्रमाचेआभार प्रदर्शन प्रा.डॉ.चत्रभुज सोळंके यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी प्रा.सुनील राऊत, प्रा.रामचंद्र केदार,प्रा. मनोज माने,प्रा.अनिल किर्दंत,प्रा.डा. बाबासाहेब हिरवे,प्रा. डॉ.आशा बोबडे व सर्व प्राध्यापक बांधव बाबुरावजी आडसकर महाविद्यालय केज तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम सुलभपणे पार पाडण्यास मदत केली.

# रामदास अंबाड सरांचा आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरव



**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील बनसारोळा येथील आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे इतिहास विषयाचे शिक्षक रामदास अंबाड सर यांना यावर्षीचा 'आदर्श शिक्षक पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.ग्रामविकास शिक्षण प्रसारक मंडळा चे सचिव बालासाहेब काकडे सर यांच्या पुढाकारातून मागील वर्षापासून हा पुरस्कार देण्याची परंपरा सुरू झाली आहे.शैक्षणिक क्षेत्रातील सातत्यपूर्ण कार्य,विद्यार्थ्यांशी असलेले घट्ट नाते आणि अध्यापनातील नवनवीन प्रयोग या गुणांच्या आधारे यावर्षीचा मानाचा पुरस्कार अंबाड सरांना देण्यात आला.

समारंभाच्या वेळी ग्रामविकास शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अशोक काकडे, सचिव बालासाहेब काकडे,विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती चव्हाण मॅडम,सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.सर्वांनी अंबाड सरांचा सत्कार करून त्यांचे मनापासून अभिनंदन केले.

रामदास अंबाड सर गेल्या अनेक वर्षांपासून इतिहास विषय शिकवत असून त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासा बरोबरच राष्ट्रीय जाण, सामाजिक जबाबदारी व नैतिक मूल्यांची जपणूक केली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊन समाजात आपले स्थान निर्माण करीत आहेत.या पुरस्कारामुळे केवळ अंबाड सरांचा नव्हे,तर संपूर्ण विद्यालयाचा मान वाढला असल्याची भावना शिक्षकांनी व्यक्त केली.

# विघ्नहर्ता गणरायाला टाळ मृदंग वाजत गाजत निरोप



**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेडच्या नरसी शहरातील बालाजी नगर येथील विघ्नहर्ता गणरायाची टाळ मृदंग वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली यांत महिला भाविकांनी गणपती बाप्पा मोरया मंगलमूर्ती मोरया घोषणा देत पावले कुगड्या,खेळत निरोप दिला मिरवणूक मार्गावर अनिल सावकार पाणी वाटप व फराळ वाटप केले मंडळाचे अध्यक्ष श्री गणेशभक्त सुभाषराव मुंक्के डोणगावकर व मंडळ सदस्यांनी अकरा दिवस विविध सामाजिक उपक्रम राबवून त्यांना बक्षीस वितरण केले तर दररोज महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते रामतिर्थ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांचा सत्कार करण्यात आला डि जे आनंदमय वातावरणांत भक्तीभावाने पूजा आरती करून गणरायाला निरोप दिला भाजपचे नेते श्रावण पाटील यांनी मंडळाचे अध्यक्ष श्री सुभाषराव मुंक्के डोणगावकर यांच्यासह सर्वांचा सत्कार केला.

# संपूर्ण साक्षरताच मानवी मुल्यांची जपणूक करेल-डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड

**केज । प्रतिनिधी**

दिनांक ०८ सप्टेंबर २०२५ रोजी स्वानंद सार्वजनिक वाचनालयात आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन साजरा करण्यात आला.या निमित्ताने व्याख्यान कार्यक्रम घेण्यातआला.व्याख्याते म्हणून ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाज सेवक,प्राचार्य डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांचे व्याख्यान संपन्न झाले.

संपूर्ण साक्षरताच मानवी मुल्यांची जपणूक करेल असे प्रतिपादन डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.संपूर्ण जगातील संपूर्ण मानवी समाज १००% साक्षर झाली पाहिजे.साक्षरता हिच खरी मानवी शक्ती आणि ताकद आहे. म्हणून संपूर्ण विश्वातील



मानवी समुह १०० % साक्षर झाला पाहिजे आणि प्रत्येक व्यक्तीने कामाच्या वाचना बरोबरच सार्वजनिक गंथालयातील ग्रंथांचे अवांतर वाचनही केले पाहिजे असे प्रतिपादन डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.

अध्यक्षस्थानी माजी सरपंच रामराजे गायकवाड हे होते. प्रमुख अतिथी म्हणून रावसाहेब जाधव, नारायणभाऊ गायकवाड, अरुण गायकवाड, रविंद्र गायकवाड पेंटर, बबन पुंड यांची उपस्थिती होती.यावेळी कृष्णा गायकवाड,विजय गायकवाड, एस.के. वैरागे,दादासाहेब गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, शिवम गायकवाड, संजय सोनवणे यांच्यासह वाचक, हितचिंतक यांची उपस्थिती होती.

दिनांक ५ सप्टेंबर २०२५ रोजी शिक्षक दिन अर्थात डॉ.सर्वोपल्ली राधाकृष्णन यांची जयंती साजरी करण्यात आली.सर्वप्रथम डॉ. सर्वोपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेलापुष्पहार अर्पन करून वंदन करण्यात आले.अत्यंत साधेपणाने शिक्षकदिन साजरा करण्यात आला

दोन्ही वेगवेगळ्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन,आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे विश्वस्त आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.

# राहुल प्रतिष्ठान शिक्षक कॉलनी केज आयोजित गणेश उत्सवसांस्कृतीक वारसा जपत मोठ्या उत्साहात साजरा


**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील शिक्षक कॉलनी,बीड रोड केज येथे राहुल प्रतिष्ठान आयोजित पारंपरिक मानाचा गणेश मंडळाचा गणेश उत्सव मोठ्या उत्साहाने एकजुटीने साजरा करण्यात आला. महाराष्ट्रातील संस्कृतीचे जतन करून कुठलाही धांगडधिंगा न करता व गणेश उत्सवाचे पावित्र्य राखून राहुल प्रतिष्ठान शिक्षक कॉलनी केज ने एक आदर्श निर्माण केला आहे.

दहा दिवस चालणारा उत्सव पहिल्या दिवशी प्राणप्रतिष्ठापना करून, रोज सकाळी, संध्याकाळी श्री.व सौ. यांच्या हस्ते आरती करण्यात आली.महिला भजनी मंडळ,काकड आरती,व विविध प्रकारचे भजन गाणी महिला भजनीमंडळींनी एकत्र घेऊन या राहुल प्रतिष्ठान शिक्षककॉलनी केज आयोजित गणेश उत्सवाची परंपरा जपून युवकांना आदर्श घालून दिला.

केज पोलिस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवने,गटनेते डॉ. हारुणभाई इनामदार, माजी सभापती विष्णू भाऊ घुले,नगराध्यक्षा डॉ.सौ.सितातार्ई बनसोड,नगरसेवक सुग्रीव भाऊ कराड, शिवाजी अप्पा हजारे, शिवाजी घुले,लक्ष्मण जाधव तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी राहुल प्रतिष्ठानच्या गणेश उत्सवात सहभागी होऊन शुभेच्छा दिल्या.

मार्गदर्शक दत्ता धस पंत,भगवान केदार,पिंटू भैय्या तांदळे,राजेश गवळी,संदीप भुतडा, अरुण बप्पा धस, प्रकाश मुंडे,खय्युमशेख, चंदू चौरे,अमोल धस, ठोंबरे बंधू,राजेभाऊ मुळे,सोनू धस,गोटू भैय्या पाळवदे,सुनील घोळवे,डॉ.विजयकुमार धस,रमेश धस,नितीन धस साहेब,गोविंद घोळवे,रवि अंधारे,पिंटू अंधारे,गोविंद काळे, नवनाथ काकड सर, रमाकांत ढाकणे सर, नवनाथ घुले,अशोक धस,मुकुंद घुले,मुळे बापू,नारायण घुले,अमर केजकर,विकास मुळे, वैभव डोईफोडे,वैभव केंद्रे,मनोज मस्के, बबलू भैय्या साखरे, प्रशांत धस,एम.डी.घुले सर,रवि घुले,अनंत आघाव सर,घोळवे हनुमंत,अमोल मुंडे




बंधू, वसंत डोईफोडे,चौरे मामा,मयुर टकले, काका बच्छाव,सोहम अंधारे,संग्राम भोसले, अजय मैंद,सुशांत केदार,विक्की घोडके, राजसाहेब ढाकणे, नागरगोजे साहेब, रामहरी घुले सर,अमोल घुले,प्रविण साबळे, गालफाडे तात्या,पप्पू गायकवाड,बाबासाहेब केदार सर,गणेश कुलकर्णी,विकास बिक्कड,प्रविणवाघमारे, योगेश हांगे,मुंडे सर व राहुल प्रतिष्ठानचे सर्व सहकारी मित्र,महिला मंडळ शिक्षक कॉलनी भागातील लहान थोर मंडळी,बच्चे कंपनी, विविध क्षेत्रातील मान्यवर यांनी मोठ्या संख्येने या उत्सवात सहभागी होऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली.शिक्षक कॉलनी परिसरातील सर्वांनी या मंगलमय उत्साहात एकीचे दर्शन घडवून एक आदर्श निर्माण केला आहे. विसर्जनाच्या दिवशी श्री गणेशाची भक्ती भावाने पूजा व आरती करण्यात आली व भव्य मिरवणूक काढण्यात आली.राहुल प्रतिष्ठान आयोजित मिरवणूकी मध्ये महिला मंडळींनी मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन मिरवणुकी शोभा वाढवली.तसेच राहुल प्रतिष्ठानच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.या महाप्रसादाचा लाभ जवळपास ११०० ते १२०० भाविक भक्तांनी घेतला.गणपतीची भव्य मिरवणूक काढून श्री गणेशाचे विसर्जन महाआरती करून करण्यात आले.राहुल प्रतिष्ठान आयोजित पारंपरिक मानाचागणेश मंडळाने सांस्कृतिक परंपरा जपून एक आदर्श निर्माण करून दिला आहे.

# समाजसेविका रुक्मिणी नागापुरे यांना कृती गौरव राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**बीड । प्रतिनिधी**

रुक्मिणी नागापुरे या बीड जिल्ह्यातील असून सम्पूर्ण महाराष्ट्र मध्ये एक समाजसेविका म्हणून त्यांची ओळख आहे. महिला आर्थिक, राजकीय, सक्षम झाल्या पाहिजे हा त्यांचा विचार. जातीभेद नष्ट व्हावा आणि समता प्रस्थापित व्हावी या साठी लढा सुरु असतो. महिलांना मार्गदर्शन, गोरगरीब लोकांच्या न्यायासाठी आंदोलन, मोर्चे निवेदन वर्षभर असं त्यांचं काम सुरु असतं. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना कृती गौरव राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. संकल्प बहुद्देशीय संस्था अकोला व बी.एस.एफ बहुद्देशीय संस्था अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. विविध क्षेत्रातील लोकांना कृती गौरव या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असून बुलढाणा जिल्ह्यातील गजानन महाराज देवस्थान शेगाव येथे हा पुरस्कार सोहळा नोव्हेंबर महिन्यात होईल. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या



५० लोकांना हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. पुरस्काराचे स्वरूप ट्रॉफी, प्रमाणपत्र व शाल या स्वरूपात असून या पुरस्कार सोहळ्याची तयारी सुरु आहे. या पुरस्कार सोहळ्याचे मुख्य आयोजक भूषण सरदार व नरेंद्र इंगळे असून आपला प्रस्ताव किंवा माहिती ९४२०६२१९९४ या व्हाट्सअप नंबर वर पाठवावी अशी माहिती बी.एस.एफ.संस्थेचे अध्यक्ष भूषण सरदार यांनी दिली.

# वंचितच्या जन आक्रोश महामोर्चास सर्व सामान्य जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे-किशोर भोले

**गेवराई । प्रतिनिधी**

बीड सर्व सामान्य जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी आता सत्ताधाऱ्यांना कुठलेही देणेघेणे राहिलेले नाही खोटे आश्वासन देऊन सर्व सामान्य जनतेचे मते घ्यायचे आणि खुर्ची मिळाली कि सामान्य जनतेला वाऱ्यावर सोडायचे परंतु नेहमी सातत्याने कष्टकरी, कामगार, शेतकरी, शेतमजूर ,उपेक्षित, निराधार ,बेघर, भुमिहीन, वंचित यांच्या प्रश्नाला न्याय देण्यासाठी वंचित बहुजन आघाडी कायम सोबत असते संविधानिक हक्क आणि अधिकारा पासून कोसो दूर असलेल्यांना कायद्यानुसार पध्दतीने प्रश्न सोडविण्यासाठी एकमेव अँड.बाळासाहेब आंबेडकर हे कायम सोबत असतात त्यामुळे सर्व सामान्य जनतेने लक्षात घेतले पाहिजे की अँड बाळासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय सामाजिक लढ्यात सर्व सामान्य जनतेने एकजुटीने सोबत राहुन येणाऱ्या काळात वंचित बहुजन आघाडीची ताकत वाढवली पाहिजे म्हणून वंचित बहुजन आघाडी गेवराई तालुक्याच्या वतीने दिनांक १२/०९/२०२५ वार शुक्रवार रोजी ठिक ११ ०० वाजता तहसील कार्यालयावर जन आक्रोश महामोर्चा धडकणार आहे या मार्चमध्ये प्रमुख मार्गदर्शक म्हणून वंचितचे राज्य महासचिव तथा जिल्हा प्रभारी किसन चव्हाण सर असणार आहेत तर वंचितचे जिल्हा अध्यक्ष अजय सरवदे यांची प्रमुख उपस्थित राहणार आहेत तसेच प्रमुख पाहुणे म्हणून तक्रार निवारण समितीचे अध्यक्ष प्रा.विष्णू जाधव इंजि. विष्णू देवकते असणार आहेत आणि विशेष उपस्थितीमध्ये जिल्हा पदाधिकारी तालुका निरिक्षक हे आहेत तालुका अध्यक्ष अजयकुमार पप्पू गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा निघणार असून वंचित बहुजन आघाडी गेवराई तालुका पदाधिकारी आयोजित हा जन आक्रोश महामोर्चा निघणार आहे तरी तालुक्यातील सर्व गायरान धारक , निराधार, अपंग, शेतकरी,शेतमजूर, अल्पभूधारक, कष्टकरी कामगार घरकुलापासुन वंचित राहीलेले घरकुल धारक यासह गेवराई तालुक्यातील भारतीय बौद्ध महासभा सम्यक विद्यार्थी आंदोलन युवक आघाडी माथाडी कामगार आघाडी समता सैनिक दल महिला आघाडीसह चळवळीतील आजी माजी तालुका पदाधिकारी कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडी गेवराई तालुका महासचिव किशोर भोले यांनी केले आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077